I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)

1. District (जिल्हा): अहिल्यानगर P.S. (पोलीस ठाणे): तोफखाना Year (वर्ष): 2026

FIR No. (प्रथम खबर क्र.): 0944 Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 13/11/2026 01:17 वाजता

2.

S.No. (अ.क्र.)	Acts (अधिनियम)	Sections (कलम)
1	भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८	7

3. (a) Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):

1 Day (दिवस): गुरूवार Date from (दिनांक पासून): 12/11/2026 Date To (दिनांक पर्यंत): 12/11/2026

Time Period (कालावधी): Time From (वेळेपासून): 12:44 तास Time To (वेळेपर्यंत): 16:20 तास

(b) Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा): Date (दिनांक): 13/11/2026 Time (वेळ): 01:08 तास

(c) General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ): Entry No. (नोंद क्र.): 005 Date and Time (दिनांक आणि वेळ): 13/11/2026 01:06 तास

4. Type of Information (माहितीचा प्रकार): लेखी

5. Place of Occurrence (घटनास्थळ):

1. (a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर): उत्तर, 2 कि.मी. Beat No. (बीट क्र.):

(b) Address (पत्ता): सहायक आयुक्त, समाज कल्याण , विभाग, अहिल्यानगर येथे ,

(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):

District (State) (जिल्हा (राज्य)):

Scanned with OKEN Scanner

6. Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):

(a) Name (नाव): पोलीस उपअधीक्षक अजित बाळकृष्ण त्रिपुटे

(b) Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):

(c) Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष): 1975

(d) Nationality (राष्ट्रीयत्व):भारत

(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):

(f) Passport No. (पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख):

Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))

S. No. (अ.क्र.)	ID Type (ओळखपत्राचा प्रकार)	ID Number (ओळखपत्र क्रमांक)

(h) Occupation (व्यवसाय):

(i) Address (पत्ता):

S.No. (अ.क्र.)	Address Type (पत्ता प्रकार)	Address (पत्ता)::
1	वर्तमान पता	लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,, अहिल्यानगर,, तोफखाना, अहिल्यानगर, महाराष्ट्र, भारत
2	स्थायी पता	लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,, अहिल्यानगर,, तोफखाना, अहिल्यानगर, महाराष्ट्र, भारत

(j) Phone number (फोन नं.):

Mobile (मोबाइल क्र.):
91-8329701344

Scanned with OKEN Scanner

7. Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):

Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या): 0

S. No. (अ.क्र.)	Name (नाव)	Alias (उर्फनाव)	Relative's Name (नातेवाईकाचे नाव)	Present Address(वर्तमान पत्ता))
1	लोकसेवक संदिप हरिभाऊ पुंदे			1. पुंदे टाकळी,ता पाथर्डी,Town/Village (शहर / गाव): जिअहिल्यानगर,Tehsil (तहसील): Police Station (पोलीस ठाणे): तोफखाना,District (जिल्हा): अहिल्यानगर,State (राज्य): महाराष्ट्र,भारत

8. Reasons for delay in reporting by the complainant / informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

S. No. (अ.क्र.)	Propertty Category (मालमत्ता वर्ग)	Property Type (मालमत्ता प्रकार)	Description (विवरण)	Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये)
1	नाणे आणि चलन	भारतीय- रुपया	75,000/रुपये	75,000.00

10. Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) : 75,000.00

11. Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):

S. No. (अ.क्र.)	UIDB Number (यु.आय.डी.बी.)

12. First Information contents (प्रथम खबर हकिगत):

फिर्याद दि. 13/11/2026

मी अजित बाळकृष्ण त्रिपुटे, वय 51 वर्शे, व्यवसाय-नोकरी, पोलीस उपअधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल्यानगर, मो.नं. 8329701344.

Scanned with OKEN Scanner

समक्ष सरकारतर्फे फिर्यादी होवुन फिर्याद देतो की, आम्ही लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल्यानगर येथे पोलीस उपअधीक्षक या पदावर दि. 27/08/2024 रोजी पासुन कार्यरत आहोत. दि.12/11/2026 रोजी आम्हास तक्रारदार श्री. प्रताप भाऊसाहेब काळे यांनी ला.प्र.वि.कार्यालयात समक्ष भेटुन त्यांची लोकसेवकाविरोधात लाचमागणीची तक्रार असल्याचे कळविले व ते लोकसेवक यांना दि. 12/11/2026 रोजी त्यांचे कार्यालयात भेटणार असल्याचे कळविले. आम्ही त्यांना दि. 12/11/2026 रोजी11/30 वा. दरम्यान अहिल्यानगर येथील सुरक्षित ठिकाणी हजर राहणेबाबत सुचना दिली. त्यानंतर आम्ही प्रादेशिक परिवहन विभाग, अहिल्यानगर येथील दोन पंच साक्षीदार उपलब्ध करून घेतलेले. पंच साक्षीदारला.प्र.वि.कार्यालयात हजर झाल्यानंतर आम्ही त्यांना एका तक्रारदार यांची लोकसेवकाविरूध्द लाचमागणीची तक्रार असुन त्याप्रमाणे कारवाई करायची आहे, सदर कारवाईमध्ये आपण पंच म्हणुन काम करण्यास तयार आहात काय याबाबत पंचांची संमती विचारली असता पंचांनी त्यास संमती दिली. तसेच आम्ही कार्यालयात हजर असलेले पोहेकॉ शिंदे, पोकॉ निमसे, पोकॉ कराड, चापोहेकॉ हारूण शेख यांना आमचे कार्यालयीन कक्षात बोलवुन दोन्ही पंचांची सापळा पथकाशी ओळख करून दिली. आम्ही सापळा पथकास सापळा कारवाईकामी आवश्यक असलेले सर्व साहित्य सोबत घेण्यास सांगुन आम्ही, दोन्ही पंच, सापळा पथकातील कर्मचारी असे सर्व साहित्यानिशी शासकिय वाहन क्र. एमएच 16 सीव्ही 0919 या वाहनाने ला.प्र.वि.कार्यालयातुन 11/15 वा. निघुन 11/30 वा. सुमारास अहिल्यानगर येथील सुरक्षित ठिकाणी पोहोचलो. त्यानंतर तक्रारदार यांनी आमचेशी संपर्क करून ते सदर ठिकाणी त्यांचेकडील चारचाकी वाहन क्र. एम एच 12 युएन 2666 या वाहनाने आम्ही थांबलो त्या ठिकाणी आले.आमचे सुचनेवरून दोन्ही पंचांनी तक्रारदार यांना त्यांचे नाव पत्ता व तक्रार विचारली असता तक्रारदार यांनी त्यांचे पुर्ण नाव प्रताप भाऊसाहेब काळे, वय 42 वर्षे, व्यवसाय- शासकिय कंत्राटदार, रा. शिवकुंज, साई कॉलनी, बालिकाश्रमरोड, सावेडी, अहिल्यानगर असे सांगुन त्यांची तक्रार सांगितली की, मी वरील ठिकाणी कुटुंबासह राहण्यास आहे. मी सन 2017 पासुन शासकिय ठेकेदार म्हणुन काम करत आहे. अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील मौजे केडगाव येथील स.नं. 49/2, 50/1 येथील महानगरपालिकेच्या जागेत संत रोहिदास विकास केंद्र उभारणे या कामाचा कार्यारंभ आदेश अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर, सार्वजनिक बांधकाम विभाग, यांचेकडील जा.क्र. 477/2023-24, दि. 13/02/2024 अन्वये मला मिळाला होता. त्याप्रमाणे मी सदरचे काम मार्च 2025 मध्ये पुर्ण केले आहे. सदर कामाची निविदा रक्कम 41,65,483/-रुपये (जीएसटी व्यतिरिक्त) होती. या कामाच्या अंतिम बिलाची रक्कम 49,80,984/-रुपये (जीएसटीसह) होती. सदर बिलापोटी मला अदयाप पावेतो 25,00,000/-रुपये मिळाले आहेत. उर्वरित रक्कम 24,80,984/-रुपये मिळणे बाकी आहेत. सदर काम लेखाशिर्षक भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना सन 2023-2024 या योजनेतुन मंजुर झाले असल्यामुळे निधी मागणीबाबतचा पत्रव्यवहार म.न.पा. अहिल्यानगर यांचेकडुन समाज कल्याण विभाग, अहिल्यानगर यांचेकडे करण्यात आलेला आहे. दि. 05/11/2026 रोजी मला श्री. संदिप पुंद्दे, समाज कल्याण निरीक्षक, समाज कल्याण विभाग, अहिल्यानगर यांचा मो.क्र. 9028742182 या नंबरवरुन फोन आला व त्यांनी मला त्यांचे कार्यालयात भेटण्यासाठी बोलविले. त्याप्रमाणे मी दि. 05/11/2026 रोजी श्री. पुंद्दे यांची त्यांचे कार्यालयात जावुन भेट घेतली असता त्यांनी मी पुर्ण केलेल्या कामाचा प्रलंबित दायित्व निधी मिळणेबाबत मंत्रालय येथे प्रस्ताव सादर

Scanned with OKEN Scanner

केला आहे, मंत्रालयातुन निधी मागविण्यासाठी व निधी प्राप्त झाल्यानंतर या कार्यालयाची पुढील कारवाई करून निधी मिळवुन देण्यासाठी 75,000/-रुपये दयावे लागतील असे म्हणुन माझेकडे लाचेची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना दिवाळीच्या सुट्टयानंतर दि. 12/11/2026 रोजी भेटतो असे सांगितले. मला त्यांना लाच देण्याची ईच्छा नाही. मी आज दि. 12/11/2026 रोजी श्री. पुंदे यांची समाज कल्याण विभाग, अहिल्यानगर येथे जावुन भेट घेणार आहे. त्यावेळी त्यांनी माझे वर नमुद काम करून देण्याच्या मोबदल्यात लाचेची मागणी केल्यास त्यांचेविरूध्द कायदेशीर कारवाई करावी. माझ्यात व श्री. पुंदे यांच्यात कोणत्याही प्रकारचा आर्थिक व्यवहार नाही. तसेच भांडणतंटा वैर नाही. श्री. पुंदे यांनी माझेकडे लाचेची मागणी केल्यास सदरची रक्कम मी माझ्या बचतीतुन हजर करीन. आता मी कार्यारंभ आदेश, देयकाची छायांकित प्रत व दि. 26/03/2025 रोजीचा सहा.आयुक्त समाज कल्याण, अहिल्यानगर यांच्या निधी वितरण आदेशाची छायांकित प्रत हजर करत आहे." अशी तक्रार सांगितली. आम्ही तक्रारदार यांची तक्रार त्यांचे स्वहस्ताक्षरात लिहुन घेतली. सदर तक्रारीवर तक्रारदार, आम्ही व दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली.

त्यानंतर तक्रारदार श्री.काळेयांचे तक्रारीप्रमाणे लोकसेवक पुंदे, समाज कल्याण निरीक्षकयांची लाचमागणी पडताळणी करण्याचे ठरले. आम्ही लाचमागणी पडताळणी कारवाईत व्हॉईस रेकॉर्डरचा वापर करण्यात येणार असले बाबत कळविले. आमचे सुचनेप्रमाणे सापळा पथकातील पोकॉ निमसे यांनी व्हॉईस रेकॉर्डरमध्ये एक नविन मेमरीकार्ड घालुन व्हॉईस रेकॉर्डर चालु करून त्या मेमरीकार्डमध्ये काहीही रेकॉर्ड नसल्याबाबत तक्रारदार व दोन्ही पंचांची खात्री करून दिली. त्यांनंतर पोकॉ निमसे यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करून त्यामध्ये तक्रारदार श्री. काळेयांनी दिलेल्या तक्रारीची पडताळणी करणेकामी आम्ही, दोन्ही पंच, तक्रारदार श्री. काळे असे उपस्थित असलेबाबत निवेदन रेकॉर्ड केले. त्यानंतर आम्ही लाचमागणी पडताळणी दरम्यान करावयाचे कारवाईबाबत तक्रारदारव पंच नं. 1 यांना सुचना समजावुन सांगितल्या. पोकॉ निमसे यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करून ते तक्रारदार श्री. काळेयांचे गळयात कोणास दिसणार नाही अशा प्रकारे अडकवुन दिला. आम्ही दिल्या सुचने प्रमाणे तक्रारदारव पंच नं. 1 तक्रारदारयांच्या चारचाकी वाहनाने लोकसेवक पुंदेयांची भेट घेण्याकरीता सहायक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, अहिल्यानगर येथे जाण्याकरीता 12/44 वाजता रवाना केले. त्यानंतर 13/22 वाजेच्या सुमारास तक्रारदारव पंच नं. 1 आम्ही थांबलो त्याठिकाणी परत आले. पोकॉ निमसे यांनी तक्रारदार यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन बंद केले. आम्ही पंच नं. 1 यांना लोकसेवक पुंदे यांची भेट घेण्याकरीता रवाना केल्यापासुन परत येई पर्यंत घडलेल्या घटने विषयी पंच नं. 2 यांचे समक्ष विचारले असता त्यांनी सांगितले की, मी वतक्रारदार असे रवाना होउन सहायक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, अहिल्यानगर येथे पोहोचलो. वाहनातुन उतरून तक्रारदार हे सदर कार्यालयाचे जिन्याने दुसऱ्या मजल्यावरील कार्यालयात गेले. मी त्यांचे पाठोपाठ सदर कार्यालयाजवळ गेलो. तक्रारदार हे कार्यालयातील एका इसमाच्या टेबलसमोरील खुर्चीत जावुन बसले. मी तक्रारदार यांचे पाठोपाठकार्यालयात जात असताना सदर इसमाने उठुन खिडकीजवळ येवुन मला काय काम आहे असे विचारून कार्यालयाच्या बाहेरच थांबण्यास सांगितले. त्यानंतर तक्रारदार व सदर इसम यांचेत बोलणे चालु झाले. मला सर्व दिसत होते. अशी हकीकत सांगितली. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना घडलेल्या हकीकतीबाबत विचारले असता त्यांनी पंच नं. 1 यांचे हकीकतीप्रमाणे हकीकत सांगुन

Scanned with OKEN Scanner

अधिकची हकीकत सांगितली की, लोकसेवक पुंदे यांनी पंच नं. 1 यांना बाहेर थांबण्यास सांगितले. माझेत व लोकसेवक पुंदे यांचेत माझे कामाबद्दल चर्चा झाली. मी त्यांना कामाबाबत कसे करायचे असे विचारले असता त्यांनी कसं करू शकता, बोलणे झाले आहे आपले सगळे.... असे सांगितले. मी त्यांना थोडे कमी करा असे म्हणालो असता त्यांनी बाकी लोकांकडुन पाच, सहा, सात टक्के प्रमाणे घेतले आहेत असे म्हणाले. मी त्यांना पाच पाच टक्के लई होतात असे म्हणालो असता त्यांनी तुमच्या सोबतचा कार्यकर्ता आहे, त्याच्यामुळे तुमचे बसलं, नाही तर ते पण नसतं झालं, असे म्हणाले. मी त्यांना माझं पुर्ण रिलीज होतील का, कसं होईल, किती होईल असे विचारले असता त्यांनी तुमचे निघतेन पंचवीस लाख असे म्हणाले. मी त्यांना ठिक आहे, तुम्ही बघाना, पहिलं आपण केल होत ना, त्या हिशोबाने काही कमी होत असेल तर असे म्हणालो असता त्यांनी मी तुम्हाला सांगतो, मार्च मध्ये पाचने, सहाने, सातने केले, मी तुमचं उलटं..... असे म्हणाले. मी त्यांना तीन वर्षे झाले आहेत, काही कमी होत असेल तर बघा असे म्हणालो असता त्यांनी आपले बोलणे झाले आहे, आपण तुमच्या बरोबर बोललो होतो, तुम्ही एस म्हणाले होते, असे म्हणाले. मी त्यांना तिकडुन लगेच रिलीज होतील की थांबाव लागेल त्यासाठी असे विचारता त्यांनी सोमवार, मंगळवार पर्यंत होईल, आधी आमच्याकडे येते, मग आम्ही पालिकेकडे वर्ग करतो, प्रस्ताव इथुनच गेलाय सेपरेट, असे म्हणाले. त्यानंतर मी त्यांना तुम्ही आहेत का दिवसभर ऑफिसला, घेवुन येतो मग असे म्हणुन तेथुन निघुन पंचासह आपण थांबले त्या ठिकाणी परत आलो अशी हकीकत सांगितली.

त्यानंतर आम्ही व दोन्ही पंचानी व्हाॅईस रेकाॅर्डर मधील तक्रारदार व लोकसेवक पुंदे यांचेतील ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण ऐकले असता, लोकसेवक पुंदे यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांच्या कामाचा प्रलंबित दायित्व निधी मंत्रालयातुन मागविण्यासाठी व निधी प्राप्त झाल्यानंतर त्यांचे कार्यालयातील पुढील कारवाई करून निधी मिळवुन देण्यासाठी त्यांचेत अगोदर ठरल्याप्रमाणे व बोलणे झाल्याप्रमाणे 75,000/-रुपये लाचेची मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले.

आम्ही तक्रारदार यांना लाचेची रक्कम हजर करण्यास कळविले असता, त्यांनी त्यांचे बचतीतुन 75,000/- रक्कम त्यात 500 रुपये दराच्या 150 भारतीय चलनी नोटा हजर केल्या. सदर नोटांचे नंबर कोऱ्या कागदावर लिहण्यात आले. तो कागद पंच नं. 2 यांचे कडे देण्यात आला. आम्ही सदर सापळा कारवाईमध्ये अँन्थ्रासिन पावडर व अल्ट्राव्हाॅयलेट दिवा यांचे गुणधर्माबाबत माहिती देवुन त्याबाबतचे प्रात्यक्षिक पोहेकाॅ शिंदे यांनी करुन दाखविले. तक्रारदार यांनी हजर केलेल्या नोटांना अँन्थ्रासिन पावडर लावण्यात आली. सदर लाच रक्कम तक्रारदार यांचे पॅन्टच्या समोरील उजव्या बाजुच्या खिशात ठेवुन दिली. त्यानंतर आम्ही तक्रारदार, दोन्ही पंचाना व सापळा पथकास आवशयकत्या सुचना दिल्या. पोकाॅ निमसे यांनी व्हाॅईस रेकाॅर्डरमध्ये एक नविन मेमरीकार्ड घालुन ते व्हाॅईस रेकाॅर्डर चालु करून तक्रारदार यांचे गळयात शर्टच्या आत अडकविले. तक्रारदारव पंच नं. 1 यांना लोकसेवक पुंदे यांची भेट घेण्यासाठी तक्रारदार यांच्या चारचाकी वाहनाने 15/46 वाजता रवाना केले. त्यांचे पाठोपाठ सापळा पथक रवाना झाले. सापळा पथक आल्याची खात्री झाल्यानंतर तक्रारदार व पंच नं. 1 असे वाहनातुन उतरुन जिन्याने वर चढुन सहायक आयुक्त, समाज कल्याण विभाग या कार्यालयाकडे गेले. सापळा पथक त्यांचे पाठोपाठ जावुन सदर कार्यालयाच्या आजुबाजुस कोणास संशय येणार नाही अशा रितीने सापळा लावुन थांबले.तक्रारदार

Scanned with OKEN Scanner

सदर कार्यालयात गेले. त्यांचेपाठोपाठ पंच नं. । गेले व तक्रारदार आणि लोकसेवक त्यांना स्पष्टपणे दिसतील अशा रितीने थांबले. थोडया वेळाने तक्रारदार व एक इसम कार्यालयातुन बाहेर येवुन स्वच्छतागृहाकडे चालत आले. त्यानंतर तक्रारदार यांनी सहायक आयुक्त यांच्या कक्षाच्या बाहेरील मोकळया पॅसेजमध्ये येवुन त्यांना ठरयुन दिलेला लाच स्यिकारले बाबतचा पुर्व नियोजीत इशारा 16/20 वा. दरम्यान केला. त्यावेळी आम्ही सर्वजण सदर ठिकाणी गेलो. आमचे सुचनेवरून पोकाॅ निमसे यांनी तक्रारदार यांचेकडील व्हाॅईस रेकाॅर्डर ताब्यात घेवुन बंद केले. आम्ही तक्रारदार यांना लाच रक्कम कोणी स्विकारली व कोठे ठेवली आहे याबाबत विचारले असता तक्रारदार यांनी सहायक आयुक्त यांच्या कक्षाच्या बाहेरील रूममध्ये उभ्या असलेल्या इसमाकडे बोट
□करून ते इसम हे "लोकसेवक पुंदे आहेत, मी त्यांची त्यांचे कार्यालयात भेट घेतली.त्यानंतर आम्ही स्वच्छतागृहाकडे चालत आलो, मी त्यांना तुमच्या मागणीप्रमाणे पुर्ण आणले आहेत पंचाहत्तर हजार रूपये, असे म्हणालो असता ते बरं बंर असे म्हणाले. मी त्यांना तुमचे जे पंचवीस आणि ते दुसऱ्या साहेबांचे कमी नाही होणारका काहीअसे म्हणालो असता पुंदे यांनी नाही, कमीटमेंट बोललो असतो,तुम्ही सध्या फायदयात आहात, असे म्हणाले. मी त्यांना वरच्या साहेबाला किती जमा होत असतील सगळया महाराष्ट्रातुनअसे म्हणालो असता फुुंदे यांनी ती एक सिस्टीम असते, एक नसत ना ते, ऑफिसमध्ये बसलेलो, मी फाईनल नसतो माझावर चार अधिकारी असतात अस असत ते, सिस्टीम असते असे म्हणाले. मी त्यांना त्यांनाही जाणार का थोडे फार असे म्हणाालो असता त्यांनी हो मंग, सगळे असतात त्यात, सिस्टीम असते ती असे म्हणाले. मी त्यांना पंचाहत्तर हजार रूपये आणलेत, पुर्ण करतो, साहेबांचे काही कमी होणार नाही का, त्यांचे काही बोलुन बघता येणार नाही का, आता दिवस लई झाले आहेत, दीड वर्श झाले आहे असे म्हणालो असता त्यांनी दिवस किती होवुदे, काहींची मागणी तीन वर्षापुर्वी पाठविली आपण, तुमचं होतयं ते महत्वाचं आहे, तो सावेडीवाला जस्ट येवुन गेला, त्याला विचारा, त्यो म्हणला पाच देतो, सध्या पैसेच नाहीत, पाच नाही दहा दिले तरी होणार नाही म्हणलं, फ्लो होता तेव्हा तुम्ही नाही ऐकलं, आसं होत मंग, असे म्हणाले. मी त्यांनाआपलं नक्की होईल ना काम असे विचारता त्यांनी षंभर टक्के होईल, सोमवार, मंगळवार पर्यंत येतील असे सांगितले. मी त्यांना मंत्रालयातुन तुमच्याकडे येतील का असे विचारले असता त्यांनी पालिकेला येतील असे सांगितले. त्यानंतर मी त्यांना पैसे इथेच देवु का टेबलवरती देवु असे विचारता त्यांनी इथेच दया असे म्हणाले. त्यानंतर मी त्यांना लाचेची रक्कम दिली असता त्यांनी ती लाचेची रक्कम स्विकारून त्यांच्या पॅन्टच्या पाठीमागील उजव्या बाजुच्या खिषात ठेवुन दिली. त्यानंतर ते सहायक आयुक्त यांच्या कक्षाच्या आत गेले व परत बाहेर आले. त्यावेळी लागलीच मीलाच स्विकारलेबाबतचा ईषारा केला, असे सांगितले. त्यानंतर आम्ही पुंदे यांना ताब्यात घेतले. आम्ही पुंदे यांना त्यांचे पुर्ण नाव विचारले असता त्यांनी त्यांचे पुर्ण नाव संदिप हरिभाऊ पुंदे, वय 42 वर्शे, धंदा नोकरी, समाज कल्याण निरीक्षक, सहायक आयुक्त, समाज कल्याण विभाग, अहिल्यानगर, रा. रूम नं. 6, इमारत नं. 6, पोलीस हेडक्वार्टर, बालिकाश्रम रोड, अहिल्यानगर, मुळ रा. पुंदे टाकळी, ता.पाथर्डी, जि.अहिल्यानगर असे सांगितले. आम्ही त्यांना लाचेच्या रकमेबाबत विचारले असता त्यांनी लाचेची रक्कम तक्रारदार यांचेकडुन स्विकारून ती सहायक आयुक्त, समाज कल्याण विभाग यांच्या कक्षाच्या आतील रूममधिल फर्निचरच्या कपाटात ठेवली असलेबाबत सांगितले. आम्ही लोकसेवक पुंदे यांचेसह सदर रूममध्ये जावुन सर्वांसमक्ष लाचेची रक्कम पंच नं. 2

Scanned with OKEN Scanner

यांचेकरवी ताब्यात घेतली. सदर लाचेच्या नोटांचे नंबर हेपुर्वी लिहिलेल्या नोटांच्या नंबराशी मिळतेजुळते आहेत याबाबत खात्री केली. सदर कक्षात पुढील तपासण्या केल्या. त्याबाबतचे फोटोग्राफ्स घेण्यात आले. त्यानंतर आम्ही पुंदे यांना ताब्यात घेयुन पुढील कामकाजाकरीता लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कार्यालयात आलो. पाठोपाठ तक्रारदार हे ला.प्र.वि. कार्यालयात आले.त्यानंतर आम्ही व दोन्ही पंचानी यशस्वी सापळा कारवाई दरम्यान व्हाॅईस रेकाॅर्डर मध्ये ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण ऐकले. त्यानंतर पंचनाम्याचे पुढील कामकाज करण्यात आले.

तरी दिनांक 12/11/2026 रोजी लाचमागणी पडताळणी दरम्यान 12/44 ते 13/22 वाजेच्या दरम्यान सहायक आयुक्त, समाज कल्याण विभाग, अहिल्यानगर येथे लोकसेवक संदिप पुंदे, समाज कल्याण निरीक्षकयांनी तक्रारदार श्री. काळे यांचेकडे त्यांच्या कामाचा प्रलंबित दायित्व निधी मंत्रालयातुन मागविण्यासाठी व निधी प्राप्त झाल्यानंतर त्यांचे कार्यालयातील पुढील कारवाई करून निधी मिळवुन देण्यासाठी त्यांचेत अगोदर ठरल्याप्रमाणे व बोलणे झाल्याप्रमाणे 75,000/-रुपये लाचेची मागणी केली व दिनांक 12/11/2026 रोजी 15/46 ते 16/20 वा. दरम्यान लाचेच्या सापळा कारवाई वेळी लोकसेवक पुंदे यांनी तक्रारदार यांचेकडुन 75,000/-रुपये लाचेची रक्कम स्विकारून गुन्हेगारी स्वरूपाचे वर्तन केले म्हणुन यातील लोकसेवक संदिप हरिभाऊ पुंदे, वय 42 वर्षे, धंदा नोकरी, समाज कल्याण निरीक्षक, सहायक आयुक्त, समाज कल्याण विभाग, अहिल्यानगर, रा. रूम नं. 6, इमारत नं. 6, पोलीस हेडक्वार्टर, बालिकाश्रम रोड, अहिल्यानगर, मुळ रा. पुंदे टाकळी, ता.पाथर्डी, जि.अहिल्यानगर यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलम 7 प्रमाणे कायदेशीर फिर्याद आहे.

दाखल अमलदार - पोहेकॉ/गणेश साठे

तपासी अमलदार -- पो नि छाया देवरे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल्यानगर,8788215086

13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.

(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):

(1) Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): Balaji Madanrao Vaidya (पोलीस निरीक्षक) **or (किंवा):**

(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव): Rank (हुद्दा):

No. (क्र.): to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)

(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):
or (किंवा)

(4) Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

Scanned with OKEN Scanner

District (जिल्हा): on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).

F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)

R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)

पोलीस ठाणे अंमलदार
तोफखाना पो.स्टेशन
अहिल्यानगर

Registered by (नोंदणी अधिकारी)

Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

Name (नाव): Balaji Madanrao Vaidya

Rank (हुद्दा): I (Inspector)

No. (क्र.): API

14. Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)

15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

Scanned with OKEN Scanner